RayatShikshanSanstha’s

# Mahatma Phule Mahavidyalaya,Pimpri,Pune-17

## DEPARTMENT OF HISTORY

### इतिहास विभाग व सांस्कृतिक विभाग आयोजित शिवराज्यभिषेक दिन सोहळा विशेष व्याख्यान

शिवस्वराज्य दिन कार्यक्रम दि. ०६ जुने २०२१ रोजी सांस्कृतिक विभाग व इतिहास विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे असे प्राचार्य डॉ. गणेश राऊत म्हणाले , वयाच्या १६ व्या वर्षी एक उत्तुंग स्वप्न पहायचे ,ते अखंड उराशी बाळगायचे व ते साकारलेले पहायचे ही साधी गोष्ट नाही. शिवरायांनी राज्याभिषेकाचे स्वप्न पाहीले व ते साकार करुन दाखविले.तरुणपणीच महाराजांनी निश्चय केला होता की,आपली राजमुद्रा असावी ,आपल्या रयतेचे राज्य असावे,त्याला राजा असावा. अनेक बलाढ्य शत्रुसंगे तुटपुंज्या सामुग्रीच्या सहाय्याने व मूठभर मावळ्यांच्या साथीने लढून तो ह्ढनिश्चय महाराजांनी प्रत्यक्षात आणला व ६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक घडवून आणला.

त्यावेळी शिवराज्याभिषेक सोहळ्यास ब्रिटन व युरोपातील अनेक देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते व त्यामुळे महाराष्ट्राच्या भूमीवरील ही पहिली आंतरराष्ट्रीय घटना म्हणावी लागेल ,व ती महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात महत्वाची घटना असेही म्हणावे लागेल ," असे प्रतिपादन पुणे येथील एच. व्ही देसाई कॉलेजचे प्राचार्य , इतिहास संशोधक डॉ.गणेश राऊत यांनी केले.

ते येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयातील सांस्कृतिक व इतिहास विभागांच्या संयुक्त विद्यमाने शिवस्वराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बोलत होते. आपल्या व्याखानादरम्यान त्यांनी राज्याभिषेक सोहळ्याचे मनोहारी वर्णन केले व अनेक संदर्भ साहित्यांचा दाखला दिला.

ऑनलाईन विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड आपल्या अध्यक्षिय मनोगतात म्हणाले, "आजच्या तरुणाईने शिवरायांची जयंती साजरी करावीच ,शिवाय महाराजांची धाडसी वृत्ती व ह्ढ मनोनिश्चयाचे गुण अंगीकारावेत व त्याप्रमाणे रयतेच्या हिताचे कार्य करावे."

कार्यक्रमाचा प्रारंभ रयतगीताने करण्यात आला.प्रास्ताविक डॉ.संजय मेस्त्री यांनी व प्रमुख वक्त्यांचा परिचय डॉ. दिनकर मुरकुटे यांनी करुन दिला. दरम्यान ग्रंथपाल डॉ. तृप्ती आंब्रे - मेस्त्री यांनी आयोजन केलेल्या शिवरायांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या ग्रंथांच्या ऑनलाईन प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.डॉ.कामायनी सुर्वे यांनी सूत्रसंचालन व उपप्राचार्य डॉ. मृणालिनी शेखर यांनी आभार मानले.प्रा. प्रिती नेवसे यांनी तंत्रसहाय्य केले.तत्पूर्वी सकाळी निवडक प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत कोविड १९ संदर्भातील नियमांचे पालन करुन छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमास उपप्राचार्य शहाजी मोरे ,निवृत्त प्रा. डॉ. नंदकिशोर पवार ,डॉ. निळकंठ डहाळे ,सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर सहकारी व विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते.






प्रमुख वक्त्यांचा परिचय डॉ. दिनकर मुरकुटे






प्रमुख मार्गदर्शक : प्राचार्य गणेश राऊत






अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड